# देगलूर महाविद्यालयात हिंदी साहित्य विषयक स्पर्धा

देगलूर : देगलूर महाविद्यालयात हिंदी सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी हस्तलिखित व स्वरचित भित्तिपत्रिकाचे विमोचन करण्यात आले त्यात बेटी, किताब, राजे, किसान आदी कविता विद्यार्थ्यांनी वाचन केल्या. हिंदी भाषा की उपयोगिता आणि महत्व आणि हिंदी भाषेचे विविध रूप या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला मोठ्या संख्याने विद्यार्थी उपस्थित होते. 'हिंदी भाषा मे रोजगार के अवसर' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेन्यात आली. अम्बिका व संस्कृति बोदमवाड, जयश्री कोंडेवाड, गायत्री यांनी कविता प्रस्तुत केल्या.



Scanned with OKEN Scanner